सदा अग्रेसर साप्ताहिक
# चित्रलेखा
२१ मार्च २०११ | १० रु.

मुखपृष्ठकथा

# घड्याळाचे काटे उलटे फिरवा! गेलेलं तारुण्य पुन्हा मिळवा!!

**कोण म्हणतं तारुण्य परत मिळवता येत नाही? कोण म्हणतं सौंदर्य फक्त निसर्गच बहाल करू शकतो? आज मेडिकल सायन्स आणि आयुर्वेदाने इतकी प्रगती केलीय की, यौवन आणि सुंदरतेचा लाभ आणि आनंद सर्वांसाठी उपलब्ध झालाय.**

■ सुधीर सकपाळ

ती *पाहाताच बाला, कलिजा खलास झाला,* अशा प्रकारचं निसर्गानं भरभरून बहाल केलेलं सौंदर्य लाभलेली लावण्यवती भल्याभल्यांची विकेट उडवते. निसर्गानं सौंदर्याची जणू *गिफ्ट*च त्या सुंदरीला बहाल केलेली असते. पण शारीरिक ठेवणीमुळे अथवा कमी-जास्त व्यंगामुळे ज्यांच्या सौंदर्याला बाधा पोहोचते, अशांचं काय? मग ती तरुणी असो वा तरुण! अशांनी आता अजिबात चिंता करण्याची गरज नाही. कारण आता वैद्यकीय क्षेत्राने इतकी प्रगती केलीय की, नैसर्गिक ठेवण कशीही असो; आपण ती आकर्षक करू शकता. आयुर्वेदातही तरुणपणात येणाऱ्या वार्धक्य आणि इतर सौंदर्याला बाधा आणणाऱ्या व्यंगांसाठी उपचार उपलब्ध आहेत.







*बर्थडे-व्हॅलेंटाइन डे* तसंच लग्नसराईत आपल्या आवडत्या व्यक्तीला कोणतं *गिफ्ट* द्यावं, याचा विचार मनात येतो. लहान मुलांच्या वाढदिवसाला *सॉफ्ट टॉइज* दिली जातात. तर तरुण-तरुणींमध्ये *ग्रीटिंग्ज,* चेन, अंगठी किंवा हृदयाच्या आकाराच्या अनेक *गिफ्ट्स*ची देवाण-घेवाण होते. *मिडल एज* असलेले म्हणजे विवाहित जोडपीही एकमेकांच्या आवडीची *गिफ्ट्स* मॅरेज ॲनिव्हर्सरीला एकमेकांना देतात.

हे झालं वस्तू वा आवडीच्या खाद्यपदार्थांच्या *गिफ्ट*विषयी. मात्र सध्या एक अनोखं, कोणालाही सौंदर्य बहाल करणारं *गिफ्ट* देण्याची पद्धत सुरू झालीय. ती *गिफ्ट* म्हणजे सुंदरतेची!

या सौंदर्याबाबत बोलताना कॉस्मॅटॉलॉजिस्ट रश्मी शेट्टी *चित्रलेखा*शी बोलताना म्हणाल्या, 'वय वाढत जातं, तसं चेहऱ्यावर ते दिसत जातं. सुरकुत्या, निस्तेजपणा, ओठांचा रूक्षपणा, तसंच प्रखर सूर्यकिरणांचा आणि प्रदूषणाचाही चेहऱ्यावर दुष्परिणाम होतो. त्यामुळे त्वचेवरील पेशीही कमी होतात. परिणामी, त्वचेचा पोत बिघडतो. या कमतरतेवर मात करण्यासाठी